**सी.एन.आर.क्र. एमएचडीएच०४०००००६५२०२६**

**दिवाणी किरकोळ अर्ज क्र. १६/२०२६ मधील निशाणी १ खालील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज हा बॉम्बे रेग्युलेशन VIII चे कलम २ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळण्याकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्ज व अर्जदारांनी अभिलेखावर सादर केलेल्या पुराव्याचे अवलोकन केले. अर्जदारांतर्फे विद्वान विधीज्ञ यांचा युक्तिवाद ऐकला.

अर्जदार यांचे कथन थोडक्यात पुढीलप्रमाणे :–

३. अर्जदार क्र. १ हिचे पती व अर्जदार क्र. २ ते ४ यांचे वडिल कै. दिलीप देवराम पाटील हे मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील कायम रहिवासी होते. त्यांचे दि.२०.१०.२०२४ रोजी मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच, कै. दिलीप देवराम पाटील यांची आई कै. गोतमाबाई देवराम पाटील हिचे देखील दि. ०६.०३.२००६ रोजी मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. मयत दिलीप देवराम पाटील यांना अर्जदार मिराबेन दिलीपभाई पाटील ही पत्नी, अनिल दिलीप जाधव हा मुलगा, सारिका सतीश पाटील व सुरेखाबेन कन्हैयालाल शेवाळे हया मुली असे कायदेशीर वारस असुन त्यांच्या व्यतिरीक्त अन्य कोणीही वारस नाहीत. अर्जदार यांना मयत दिलीप देवराम पाटील यांच्या मृत्युपश्चात शासकीय व निमशासकीय कामांकरीता वारसा प्रमाणपत्राची अत्यंत आवश्यकता आहे. सबब, अर्जदारांतर्फे विनंती करण्यात आली आहे की, अर्जदार यांना ते कै. दिलीप देवराम पाटील यांचे वारस असलेबाबत वारसा प्रमाणपत्र मिळावे.

४. अर्जदारांच्या मागणी प्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यासंदर्भात इतर कोणाच्या

काही हरकती असतील, तर त्या मागवण्याकरीता 'दैनिक वार्ता', धुळे नंदुरबार आवृत्ती या वृत्तपत्रात दि.३०.०१.२०२६ रोजी जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. सदर वृत्तपत्राची प्रत नि.क्र.१० कडे दाखल आहे. परंतु, प्रस्तुत कामी अर्जदारांच्या अर्जास कोणीही इसमाने हजर होऊन हरकत घेतलेली नाही.

५. अर्जदाराने अर्जातील कथनांच्या पुष्टयर्थ नि.क्र. ११ व १३ कडे अर्जदार क्र. २ याचे सरतपासाचे प्रतिज्ञापत्रे दाखल केलेली आहेत. नि.क्र.११ कडील शपथपत्रामध्ये त्याने अर्जातील कथनांचा पुनरुच्चार केलेला आहे. तसेच, नि.क्र.१३ कडील शपथपत्राद्वारे कथन केले आहे की, कै. दिलीप पाटील यांचे कागदोपत्री पाटील हे आडनाव असुन अर्जदार क्र. २ याचे कागदोपत्री जाधव हे आडनाव आहे. तरी, जाधव हे त्यांचे कुळ असुन पाटील ही त्यांची जात आहे. तसेच, अर्जदाराने नि. क्र. १२ कडे साक्षीदार किशोर सिताराम वानखेडे (सा.क्र.२) याचे शपथपत्र दाखल केलेले आहे. किशोर (सा.क्र.२) याचे त्याद्वारे थोडक्यात कथन असे की, तो मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील रहिवासी आहे. तसेच, कै. दिलीप देवराम पाटील यांची आई कै. गोतमाबाई देवराम पाटील हिचे देखील दि. ०६.०३.२००६ रोजी मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तिच्या अंत्यविधीस तो स्वत: हजर होता. उपरोक्त तोंडी पुराव्या व्यतिरिक्त अर्जदारांनी कागदोपत्री पुरावा देखील सादर केलेला आहे. अर्जदारांनी नि.क्र.१४ कडे हजर केलेल्या मृत्यू प्रमाणपत्राचे अवलोकन करीता असे दिसून येते की, कै. दिलीप देवराम पाटील यांचे दि. २०.१०.२०२४ रोजी मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. उपरोक्त कागदोपत्री पुरावा हा अर्जदार यांच्या तोंडी पुराव्यास पुष्टी देणारा आहे.

६. अर्जदारांच्या अर्जातील कथनांना व त्यातील त्यांच्या मागणीला कोणीही हरकत घेतलेली नाही. तसेच, त्यांनी सादर केलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा हा विनाआव्हानित राहीलेला आहे. त्यामुळे त्याच्यावरती विश्वास ठेवणे रास्त होईल असे माझे मत आहे. वरील तोंडी व कागदोपत्री पुराव्यावरुन असे दिसून येते की, कै. दिलीप देवराम पाटील हे मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथील कायम रहिवासी होते. त्यांचे दि.

२०.१०.२०२४ रोजी मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. तसेच, कै. दिलीप देवराम पाटील यांची आई कै. गोतमाबाई देवराम पाटील हिचे देखील दि.०६.०३.२००६ रोजी मौजे सुराय, ता. शिंदखेडा, जि. धुळे येथे निधन झालेले आहे. वरील पुराव्यावरुन हे ही स्पष्ट होते की, मयत दिलीप देवराम पाटील यांना अर्जदार मिराबेन दिलीपभाई पाटील ही पत्नी, अनिल दिलीप जाधव हा मुलगा, सारिका सतीश पाटील व सुरेखाबेन कन्हैयालाल शेवाळे हया मुली असे नातलग आहेत. अशा परिस्थितीत, कै. दिलीप देवराम पाटील यांचे पश्चात अर्जदार हे हिंदु वारसा कायद्याप्रमाणे त्यांना सरळ व कायदेशीर वारस आहेत असा निष्कर्ष निघतो. सबब, बॉम्बे रेगुलेशन VIII चे कलम २ व ३ प्रमाणे, अर्जदार हे मयत दिलीप देवराम पाटील यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत प्रमाणपत्र मिळण्यास पात्र ठरतात. म्हणून, मी वरील चर्चीत कारणांकरिता पुढील आदेश पारित करीत आहे :–

**– आदेश –**

१) अर्ज मंजुर करण्यात येतो.

२) अर्जदार मिराबेन दिलीपभाई पाटील, अनिल दिलीप जाधव, सारिका सतीश पाटील व सुरेखाबेन कन्हैयालाल शेवाळे हे मयत दिलीप देवराम पाटील यांचे सरळ व कायदेशीर वारस आहेत असे जाहीर करण्यात येते.

३) योग्य तो मुद्रांक शुल्क भरून घेऊन, अर्जदारांना त्यांच्या मागणीप्रमाणे वारसा प्रमाणपत्र देण्यात यावे.

ADITYA GHANSHAM NAIK

Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.03.09 17:55:28 +0530

ठिकाण : दोंडाईचा
दिनांक : ०९/०३/२०२६

( आदित्य घ. नाईक)
दिवाणी न्यायाधीश (क–स्तर),
दोंडाईचा

**प्रमाणपत्र**

मी, खात्रीपूर्वक कथन करतो की, पी.डी.एफ. फाईल मधील आदेशाचा/ न्यायनिर्णयाचा संपूर्ण मजकूर हा मूळ आदेशाप्रमाणे/न्यायनिर्णयाप्रमाणे शब्दशः, तंतोतंत व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव – गणेश साईनाथ अहिरे,

न्यायालयाचे नांव – दिवाणी व फौजदारी न्यायालय, दोंडाईचा.

दिनांक – ०९/०३/२०२६.

सही/–
लघुलेखक–(श्रेणी–३)